# Greenlawns School, Worli

**Preliminary Examination – 2025-26**

**मराठी**

**इयत्ता:- दहावी** **पूर्णांक:- ८०**

**दिनांक:- १५.०१.२०२६** **वेळ –२ तास**

**सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.**

**शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.**

---

**प्र. १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-.** **(१०)**

१. **मी माझ्या देशाचा नागरिक**

२. **अकस्मात पडलेला पाऊस**

३. **सैनिकाचे आत्मकथन**

**प्र.२) विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने शालेय ग्रंथालयासाठी ज्ञानसागर ग्रंथ भांडार ,महात्मा गांधी रोड, दादर(प.),येथून पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.** **(७)**

**प्र. ३) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**आजच्या आधुनिक व स्पर्धात्मक युगात शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिक्षणामुळे माणसाच्या बौद्धिक, सामाजिक आणि नैतिक विकासाला चालना मिळते. शिक्षण घेतलेल्या व्यक्तीमध्ये योग्य-अयोग्य यातील फरक करण्याची क्षमता निर्माण होते. त्यामुळे तो विवेकपूर्ण निर्णय घेऊ शकतो. शिक्षण हे केवळ नोकरी किंवा पैसा मिळवण्याचे साधन नसून ते माणसाला सुजाण आणि जबाबदार नागरिक बनवते.**

**शिक्षित व्यक्ती समाजातील विविध समस्या समजून घेतात. अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्र्य व अन्याय यांविरुद्ध लढा देण्यासाठी शिक्षणाची फार मोठी भूमिका आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये आत्मविश्वास वाढतो. आत्मविश्वास असलेली व्यक्ती कोणत्याही अडचणीला धैर्याने सामोरे जाते व संकटांवर मात करते.**

**तसेच शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये शिस्त, संस्कार आणि नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण होते. यामुळे समाजात शांतता, सुव्यवस्था आणि सहकार्य वाढते. शिक्षित समाज अधिक प्रगत, सुसंस्कृत आणि सक्षम बनतो. म्हणूनच शिक्षण ही प्रत्येकाच्या जीवनातील मूलभूत आणि अत्यावश्यक गरज आहे.**

**प्रश्न**

1. **आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षणाचे महत्त्व का वाढले आहे?** **(२)**
2. **शिक्षणामुळे समाजाच्या प्रगतीस कशी मदत होते ते लिहा.** **(२)**
3. **शिक्षणामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर होणारे परिणाम लिहा.** **(२)**
4. **शिक्षण ही प्रत्येकाच्या जीवनातील मूलभूत गरज आहे" या विधानाचे समर्थन करा.** **(२)**
5. **वाक्य बनवा :- नोकरी , नागरिक** **(२)**

**<u>व्याकरण - विभाग</u>**

**प्रश्न ४) अ) समानार्थी शब्द लिहा :-** **(२)**

**१. नयन** -

i) **नाक** ii) **कान** iii) **डोळा** iv) **भुजा**

**२. पाणी -**

i) **तीर** ii) **नीर** iii) **निर** iv) **नीट**

**आ) विरुद्धार्थी शब्द लिहा :-.** **(२)**

**१. सुकाळ -**

i) **दुर्कळ** ii) **दुस्काळ** iii) **दुष्काळ** iv) **दूष्काळ**

**२. आधुनिक -**

i) **नवीन** ii) **पराचीन** iii) **प्राचीन** iv) **प्राचिन**

**इ) शब्द समूहाबद्दल एक शब्द लिहा :-** **(२)**

i) **वाईट आचरण करणारा -**

i) **दुराचारी** ii) **सदाचारी** iii) **दूराचारी** iv) **दूरचारी**

ii) **लोकांचा मताने चाललेले राज्य -**

i) **प्रजासत्या** ii) **प्रजासात्का** iii) **प्रजासत्ताक** iv)**प्रजसत्ताक**

**ई) खालील वाक्यातील रेखांकित विकारी शब्दाचा प्रकार लिहा.** **(२)**

**१) <u>शिरीष</u> गप्प बसला आणि मी काहीच बोलू शकत नव्हतो.**
**२) <u>अरेरे !</u> तो शाळासमोर कचरा फेकत आहे.**

**उ) खालील वाक्यांचे प्रकार ओळखून लिहा.** **(३)**

i) **केवढी उंच इमारत ही !**
ii) **गुलाबाची झाडे मला आवडतात.**
iii) **हा निबंध कुणी लिहिला ?**

**ऊ) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून ती वाक्ये पुन्हा लिहा.** **(२)**

**i) बाबांनी दुकानातून सुपारी बदाम खोबरे व मनुका आणल्या**
**ii) काहीतरीच मला नाही पटत काका म्हणाले**

**<u>साहित्य – विभाग ( अंक – ४० )</u>**

**प्र. ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :-** **(९)**

**१) युनियन हायस्कूलमधील शिक्षकांची वैशिष्ट्ये लिहा. लेखकाला शिक्षणाबद्दल आंतरिक ओढ का निर्माण झाली ?**
**२) पंतांच्या उपासाबाबत त्यांच्या पत्नीचा अवर्णनीय उत्साह तुमच्या शब्दांत वर्णन करा.**
**३) 'तापानं फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा.**

**आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :-** **(३)**

**१) स्नेहल ने कोणता निश्चय केला ?**
**२) सुमित ने कुणाकुणाचा डाटा ॲपमध्ये भरला ?**
**३) पंतांना शेजाऱ्यांनी दिलेले भाताचे पदार्थ कोणते ?**

**इ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :-** **(३)**

**१) __________ हीच प्रत्येक मुलाची पहिली शिक्षक असते.**

**२) किती प्रचंड __________ चिकटलेला असतो, आपल्या पायांना ! ग्लोबल वार्मिंगला हातभार लावतो आपण.**

**३) "खरं म्हणजे पत्ते खेळायचं सोडा. बसून बसून _________ वाढतं ."**

**ई) एका शब्दात उत्तरे लिहा :-** (४)

**१) पंतांची रास कोणती होती ?**

**२) सुमित येथे शिकत होता -**

**३) पंतांना अमृतासारखा वाटणारा रस -**

**४) लेखकाचे जन्मगाव -**

**उ) कोण-कोणास म्हणाले ते लिहा** **(३)**

**१) "रनिंग कर रोज."**

**२) 'एकदम लोन्यागत पाय हाय काकांचा'**

**३) "तेल आणि तळलेले पदार्थ आधी सोडा."**

**ऊ) शब्दार्थ लिहा :-** **(३)**

**१. उत्सर्जन -**

**२. निरपेक्ष -**

**३. अंगाचा तिळपापड होणे -**

## <u>कविता – विभाग</u>

**प्र. ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:-** **(६)**

**१. ' स्वप्न करू साकार ' या कवितेत कवीने बघितलेले स्वप्न तुमच्या शब्दांत लिहा.**

**२. संत नामदेवांनी परमेश्वराकडे केलेली विनंती सोदाहरण स्पष्ट करा.**

**आ) कोण ते लिहा :-** **(२)**

१) परमेश्वराचे दास -

२) स्वप्न करू साकार ' या कवितेचे कवी-

**इ) पुढील कवितेच्या ओळींचे भावार्थ लिहा :-** **(२)**

या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार

नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार ॥

**ई)शब्दार्थ लिहा :-.** **(५)**

१. काज -

२. ललकारणे-

३. कनवाळू -

४. विभव -

५. पाडस -

-----------×समाप्त ×----------------